# शिवाजी विद्यापीठात समुपदेशनाची सुविधा

## परीक्षांबाबत मिळणार माहिती; विभागप्रमुखांची नियुक्ती

कोल्हापूर, ता. २० : कोरोनामुळे शिवाजी विद्यापीठाच्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणाच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षा जुलैमध्ये होणार आहेत. याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी 'विद्यार्थी समुपदेशन आणि मार्गदर्शन कक्ष' स्थापन करण्यात आला आहे. यामध्ये प्रत्येक शाखेनुसार विभागप्रमुखांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे मोबाईल क्रमांकही देण्यात आले आहेत. या क्रमांकावर विद्यार्थी त्यांच्याशी संपर्क साधू शकतात. परीक्षांचे वेळापत्रक व त्यासंदर्भातील अन्य माहिती या विभागप्रमुखांकडून मिळणार आहे.

**शाखानिहाय विभागप्रमुख**

| शाखा | विभागप्रमुख | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| बी.ए. | एस. आर. कोळी | ९५४५४५१०३० |
| बी.कॉम. | एस. जे. कोकाटे | ९९७०३३०२२४ |
| बी.एस.सी | एस. जी. पाटील | ९७६३४१३५५९ |
| इतर परीक्षा १ | वाय. बी. पाटील | ९९२११९८६६९ |
| इतर परीक्षा २ व ३ | डी. के. कुंडले | ९९२२८०८१४० |
| अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विभाग | आर. बी. सूर्यवंशी | ९१५८०७०९०९ |